


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on




E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - १६९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १० ऑगस्ट २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -४

# आश्रमशाळेत काळरात्र; जमिनीवर झोपलेल्या विद्यार्थिनींना सर्पदंश

## सर्पदंशाने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू, आणखी तीन मुली गंभीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०गडचिरोली :** जागतिक आदिवासी दिनाचा उत्साह जिल्ह्यात सुरू असतानाच धानोरा तालुक्यातील जपतलाई येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेने या उत्सवावर दु:खाचे सावट पसरले आहे. अनुदानित आदिवासी आश्रमशाळेच्या वसतिगृहात झोपलेल्या विद्यार्थिनींना विषारी सापाने दंश केल्याने तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला, तर आणखी तीन मुलींवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. ही घटना रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली.धानोरा तालुका मुख्यालयापासून सुमारे दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या जपतलाई येथील कुप्पा लिंगो शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन शाळा तथा अनुदानित आश्रमशाळेच्या वसतिगृहात ही घटना घडली. मृत विद्यार्थिनींमध्ये सुश्मिता सरोजित मंडल (१४), दीपिका एतवा लकडा (१२) आणि अनु गजुराम कोरेटी (८) यांचा समावेश आहे. सर्पदंश झालेल्या दीपिका बिटलूरसाय मडावी (११), समृद्धी सुरेश नैताम (१४) आणि



कविता राजकुमार किरंगा (१२) यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, वसतिगृहातील विद्यार्थिनींना झोपण्यासाठी पुरेशा खाटा उपलब्ध नसल्याने त्या जमिनीवर गाद्या अंथरून झोपत होत्या. मध्यरात्रीच्या सुमारास झोपेत असतानाच काही विद्यार्थिनींना सापाने दंश केला. घटनेची माहिती मिळताच त्यांना उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच किंवा उपचारादरम्यान तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाला. या घटनेमुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वसतिगृहात विद्यार्थिनींच्या निवासाची व्यवस्था, स्वच्छता, सर्पप्रतिबंधक उपाययोजना आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याची यंत्रणा याबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

घटना घडली त्यावेळी वसतिगृहाच्या महिला अधीक्षिका उपस्थित नसल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेची जबाबदारी असलेल्या यंत्रणेच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून निष्काळजीपणास जबाबदार असलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# 'पुराने पेडो का मजाक उडा रहेथे नये पौधे...'

## नवनीत राणांचे स्टेटस चर्चेत, रवी राणा आणि भाजपमधील वादानंतर नेमका रोख कोणावर?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती** अमरावतीच्या राजकारणात सध्या सुरू असलेल्या शाब्दिक चकमकींच्या पार्श्वभूमीवर माजी खासदार नवनीत राणा यांचे एक नवे व्हॉट्सअ‍ॅप स्टेटस राजकीय वर्तुळात जोरदार चर्चेचा विषय ठरले आहे. 'पुराने पेडो का मजाक उडा रहेथे नये पौधे... इन्होने अभी तुफानो के झटके नही देखे....' असे सूचक स्टेटस त्यांनी ठेवले आहे.

विशेष म्हणजे, गेल्या २४ तासांतील त्यांचे हे दुसरे लक्षवेधी स्टेटस असून, यामधून त्यांनी नेमका कोणावर निशाणा साधला आहे, याबाबत विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत.

नवनीत राणा यांचा हा टोला पक्षांतर्गत स्वकीयांना आहे की अन्य राजकीय विरोधकांना, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, नुकत्याच आमदार रवी राणा आणि भाजपच्या आमदारांमध्ये उफाळून आलेल्या वादानंतर, नवनीत राणा यांच्याकडून सोशल मीडियावर सातत्याने अशा प्रकारच्या पोस्ट केल्या जात आहेत. त्यामुळे त्यांच्या या नव्या स्टेटसमागील खरा रोख नेमका कुणाकडे आहे आणि त्यातून त्यांना काय संदेश द्यायचा आहे,

### 'दुनिया कहती है खेल बदलना मुश्किल है..'

यापूर्वी नवनीत राणा यांनी आमदार रवी राणा यांच्या छायाचित्रासोबत 'दुनिया कहती है खेल बदलना मुश्किल है, लेकिन मै खेल नही खेल खेलने वाले बदल देता हु....' असे कॅप्शन असलेले स्टेटस ठेवून राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली होती. या पहिल्या स्टेटसमधून त्यांनी नेमका कोणाला इशारा दिला याची चर्चा ताजी असतानाच, आता त्यांनी 'पुराने पेडो का मजाक उडा रहेथे नये पौधे... इन्होने अभी तुफानो के झटके नही देखे....' असे आणखी एक नवे सूचक स्टेटस ठेवल्यामुळे अमरावतीच्या राजकारणातील या चर्चांना आता अधिकच वेग आला आहे.

यावरून अमरावतीच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

**नवनीत राणांच्या सूचक स्टेटसने वाढवली चर्चा**

नवनीत राणा यांच्या नव्या व्हॉट्सअ‍ॅप स्टेटसमध्ये कोणत्याही नेत्याचा किंवा राजकीय पक्षाचा थेट उल्लेख केलेला नाही. त्यामुळे त्यांचा हा नेमका रोख भाजपमधील स्वकीयांकडे आहे की राजकीय विरोधकांकडे, याबाबत अमरावतीच्या राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लढवले जात आहेत. आमदार रवी राणा यांनी केलेल्या एका वादग्रस्त वक्तव्यानंतर भाजपच्या तीन आमदारांनी पत्रकार परिषद घेऊन त्यांना सडेतोड प्रत्युत्तर दिले होते. याच ताज्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर नवनीत राणा यांचे हे नवे स्टेटस समोर आल्याने, त्याचा थेट संबंध या राजकीय वादाशीच जोडला जात आहे.

## लक्ष्मण हाके यांचे मनोज जरांगेंवर टीकास्त्र

# म्हणाले- चार कुणबी प्रमाणपत्रे रद्द झाली तर थयथय नाचतायत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०सोलापूर-** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण पुन्हा तापले असताना ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर सोलापुरातून जोरदार पलटवार केला आहे. राज्यातील ओबीसी आरक्षण संपल्याचा दावा करत हाके यांनी सरकारसह ओबीसी नेत्यांनाही लक्ष्य केले. कुणबीची चार प्रमाणपत्रे रद्द झाली तर जरांगे थयथय नाचत आहेत. मग ओबीसींच्या आरक्षणाचे काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मनोज जरांगे पाटील यांनी



पुन्हा आंदोलनाची हाक दिल्यानंतर पश्चिम महाराष्ट्राचा दौरा सुरू केला आहे. सोलापूर दौऱ्यात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर जोरदार टीका केली होती. त्यानंतर आता लक्ष्मण हाके यांनी सोलापुरातील अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून पत्रकार परिषद घेत जरांगे यांच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले.राज्यातील ओबीसी आरक्षण संपले आहे की नाही, हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट करावे, अशी मागणी लक्ष्मण हाके यांनी केली. मनोज जरांगे जात पडताळणी समितीवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.महसूलमंत्र्यांना मी गिनत नाही, असं दाखवलं जात आहे. ही दहशतवादाची भाषा आहे, असा घणाघात हाके यांनी केला.ओबीसी नेत्यांनी आता भूमिका स्पष्ट करण्याची वेळ आली असल्याचे सांगत त्यांनी सवाल केला की, शासनकर्तेच मोठ्या प्रमाणावर ओबीसी म्हणून निवडून आले असतील तर मूळ ओबीसी कुठे आहेत? कुणबी प्रमाणपत्रांच्या मुद्द्यावरूनही हाके यांनी जरांगे यांच्यावर टीका केली. ओबीसींच्या जागा मराठा–कुणबी यांनी घेतल्या आहेत. त्यामुळे ओबीसींचे आरक्षण संपले आहे. कुणबीची चार प्रमाणपत्रे रद्द झाली तर जरांगे थयथय नाचत आहेत, असा टोला त्यांनी लगावला.

# अमरावती,अकोला सह राज्यात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता

## हवामान विभागाकडून 'येलो अलर्ट' जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती-** राज्यात सध्या पावसाने काही प्रमाणात उघडीप दिली असली, तरी ऊन-सावल्यांच्या खेळादरम्यान विविध जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस हजेरी लावत आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, आज राज्यातील पुणे जिल्ह्याचा घाटमाथा, अकोला आणि अमरावती या भागांत मुसळधार पावसाची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. खबरदारीचा उपाय म्हणून हवामान खात्याने मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांना 'येलो अलर्ट' जारी केला आहे.




पुण्यातील घाटमाथा, अकोला आणि अमरावतीमध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर जळगाव, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यांमध्ये वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता आहे. उर्वरित मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यात मात्र ऊन-सावल्यांच्या खेळासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळतील.हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, मॉन्सूनचा आस असलेला कमी दाबाचा पट्टा सध्या राजस्थानच्या बिकानेरपासून मध्य प्रदेश, छत्तीसगड मार्गे पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरापर्यंत सक्रिय आहे. याशिवाय दक्षिण मध्य महाराष्ट्रावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाली आहे. येत्या १३ तारखेपर्यंत बंगालच्या उपसागरात नवीन कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याचे संकेत आहेत..

# राहुल रावेरकर हत्याकांडातील आरोपींची गावातून धिंड

## संतप्त ग्रामस्थांचा पोलिसांना घेराव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती :** धामोरी येथील राहुल रावेरकर हत्याकांडातील आरोपी साहिल भगत आणि पियुष गायकवाड यांची पोलिसांनी मृतक राहुल रावेरकर यांच्या वाठोडा शुक्लेश्वर गावातून धिंड काढली. आरोपींना गावातून नेत असताना मोठ्या संख्येने ग्रामस्थ रस्त्यावर जमा झाले. यावेळी संतप्त नागरिकांमध्ये प्रचंड रोष पाहायला मिळाला.आरोपींची धिंड सुरू असताना काही



ग्रामस्थांनी आक्रमक होत आरोपींच्या अंगावर चालून जाण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती चिघळू नये यासाठी पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत आरोपींना सुरक्षितपणे पोलिस वाहनात बसविले. मात्र, संतप्त ग्रामस्थांनी पोलिसांच्या वाहनाला घेराव घातला.यावेळी मारेकऱ्यांना आमच्या ताब्यात द्या अशी मागणी करत नागरिकांनी पोलिसांच्या वाहनाचा पाठलाग केल्याचे समोर आले. राहुल रावेरकर यांच्या हत्येने गावात संतापाची लाट उसळली असून, आरोपींना कठोरात कठोर शिक्षा, तसेच फाशीची शिक्षा देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली.घटनेच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठा बंदोबस्त तैनात केला. आरोपींना न्यायालयासमोर हजर करून पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

# धक्कादायक! जळगाव बसस्थानका मधून चक्क नवी कोरी एसटी बस गेली चोरीला

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१०जळगाव** जळगाव जिल्ह्यातील जामनेर आगारातून चक्क महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (डढ ईी) नवी कोरी बसच चोरांनी चोरून नेल्याची धक्कादायक आणि तितकीच विचित्र घटना समोर आली आहे. या अजब चोरीच्या प्रकारामुळे संपूर्ण जळगाव जिल्ह्यात आणि एसटी महामंडळात एकच खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, जळगावच्या जामनेर आगारात उभी असलेली एक नवी कोरी एसटी बस मध्यरात्री २ वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी शिताफीने पळवून नेली. ऐन मध्यरात्री बस चोरीला गेल्याची माहिती समोर आल्यानंतर आगार प्रशासनाची मोठी धावपळ उडाली. चोरीची ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली. चोरट्यांनी आगारातून बस नेली कशी? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

बस चोरून पळून जाणाऱ्या चोरट्यांचा हा प्रयत्न मात्र अपयशी ठरला आहे. पळवून नेलेली ही बस जामनेर तालुक्यातील शहापूर गावाजवळ पोहचली असता, तिचे एक चाक पंचर झाले. अचानक चाक पंचर झाल्यामुळे चोरट्यांची तारांबळ उडाली आणि पुढे जाणे अशक्य झाल्याने ते बस रस्त्याच्या कडेला सोडून अंधाराचा फायदा घेत पसार झाले.आज सकाळी शहापूर गावाजवळ रस्त्याच्या कडेला सोडून दिलेली ही लालपरी (एसटी बस) पाहण्यासाठी परिसरातील ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. मध्यरात्रीच्या वेळी थेट आगारातूनच बस चोरीला गेल्यामुळे जामनेर एसटी आगारातील सुरक्षेवर आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांकडून सध्या याप्रकरणी अधिक तपास सुरू असून अज्ञात चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.

# जंतर-मंतरवरील लाठीचार्ज, पॅलेट गन आणि अश्रुधुरावरून राहुल गांधींचा मोदी-शहांवर हल्लाबोल

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१०नवी दिल्ली : -** राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनादरम्यान युवा विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज, पॅलेट गनचा वापर आणि अश्रुधुराच्या गोळ्यांचा मारा करण्यात आल्याच्या आरोपांवरून काँग्रेसचे खासदार राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आज पत्रकार परिषद घेत केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. यावेळी दोन्ही नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर गंभीर आरोप करत या घटनेबाबत स्पष्टीकरणाची मागणी केली.राहुल गांधी यांनी राम मंदिरातील चढावा चोरीच्या कथित प्रकरणावरूनही सरकारला प्रश्न विचारले.

तसेच दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील कारवाईबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे तीन प्रमुख मागण्या केल्या.राहुल गांधी म्हणाले की, अमित शाह यांनी संसदेत एखाद्या सामान्य विषयावर भाषण करावे की नाही, हा प्रश्न नाही. दिल्लीमध्ये तरुणांवर गोळीबार करण्याचे आदेश नेमके कोणी दिले, हे गृहमंत्र्यांनी स्पष्ट करणे हा मुख्य प्रश्न आहे. ते देशाचे गृहमंत्री आहेत. गोळीबाराचा आदेश त्यांनी दिला होता का? किंवा त्यांना या घटनेची



माहितीच नव्हती का? या दोन्हीपैकी कोणतीही परिस्थिती असली तरी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यायला हवा, असा दावा राहुल गांधी यांनी केला.तसेच दिल्लीतील विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईची जबाबदारी स्वीकारून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची माफी मागावी, अशी मागणीही त्यांनी केली.'मोदी-शहांमध्ये संसदेत येण्याचे धैर्य नाही'राहुल गांधी यांनी पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांवर टीका करताना म्हटले की, गेल्या १५ दिवसांपासून त्यांचा संसदेकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट दिसून येत आहे. संसदेत येऊन या घटनेवर बोलण्याचे किंवा झालेल्या प्रकाराची जबाबदारी स्वीकारण्याचे धैर्य त्यांच्यात नाही. दिल्लीतील विद्यार्थ्यांसोबत जे घडले, त्यावर पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनी भाष्य करणे आवश्यक असतानाही ते मौन बाळगत आहेत.तीन मागण्यांवर राहुल गांधी ठामराहुल गांधी यांनी केंद्र सरकारसमोर तीन प्रमुख मागण्या ठेवल्या. दिल्लीतील विद्यार्थ्यांवर गोळीबाराचा आदेश कोणी दिला, हे अमित शाह यांनी स्पष्ट करावे; या घटनेची माहिती नसल्यास त्याची जबाबदारी स्वीकारून गृहमंत्र्यांनी राजीनामा द्यावा आणि विद्यार्थ्यांवर झालेल्या कारवाईबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली.दरम्यान, या प्रकरणावर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनीही केंद्र सरकारवर निशाणा साधत विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले.

## संपादकीय ......

# चिपनिर्मितीत भारताची झेप

*भारताने २०२१ मध्ये देशात 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन'ची अधिकृत सुरुवात केली होती. आता या महत्त्वाकांक्षी मोहिमेला प्रभावी आयाम दिला गेला आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने अलीकडेच 'सेमीकंडक्टर मिशन २.०' ला अत्यंत महत्त्वपूर्ण मंजुरी दिली असून, यासाठी तब्बल १.२७ लाख कोटी रुपयांच्या प्रचंड रकमेची भरीव खात्रीशीर तरतूद केली गेली आहे. आपण यापूर्वीच्या ७६,००० कोटी रुपयांच्या मूळ कार्यक्रमाचा विचार केला, तर हा नवीन टप्पा त्याहून कितीतरी पटीने अधिक मोठा, विस्तृत आणि सर्वसमावेशक आहे. सरकारच्या या नव्या आणि विशाल धोरणाचा मुख्य उद्देश हा केवळ भारतात चिप्सचे फॅब्रिकेशन किंवा उत्पादन सुरू करणे एवढाच मर्यादित नाही, तर यामध्ये चिप्सची डिझाईन तयार करण्यापासून ते थेट त्यांचे शेकडो प्रकारांत परीक्षण, पॅकेजिंग, त्यासाठी लागणारी रसायने, विशिष्ट मशिनरी, संशोधन आणि या संपूर्ण क्षेत्रासाठी अत्यंत कुशल मानवी संसाधन तयार करून एक परिपूर्ण सेमीकंडक्टर पुरवठा साखळी भारतातच निर्माण करणे हा आहे.*

*डिसेंबर २०२१ मध्ये जेव्हा याची पहिली पायाभरणी झाली होती, तेव्हा जगभरात सेमीकंडक्टरची प्रचंड टंचाई होती. वाहन उद्योगापासून ते अगदी सामान्य इलेक्ट्रॉनिक्स आणि मोबाईल कंपन्यांपर्यंत सर्वांचेच उत्पादन या भीषण टंचाईमुळे विस्कळीत झाले होते. काही मोजके देशच सेमीकंडक्टरचे मोठे उत्पादक असल्यामुळे संपूर्ण जग पूर्णपणे त्यांच्याच कृपेवर आणि पुरवठ्यावर अवलंबून होते. याच ऐतिहासिक पेचप्रसंगातून मार्ग काढत भारत सरकारने भविष्यात कधीही अशा संकटाचा सामना करावा लागू नये म्हणून देशातच चिप उत्पादनाचा पाया रचण्याची मोहीम हाती घेतली. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान मंत्रालयाच्या माहितीनुसार, या संपूर्ण मिशनचा मूळ उद्देश हा केवळ देशांतर्गत गरज भागवणे हा नसून, भारत देशाला जागतिक स्तरावर सेमीकंडक्टर उत्पादनाची अत्यंत महत्त्वाची आणि भक्कम महाशक्ती बनवणे हा आहे. सेमीकंडक्टर इंडिया १.० च्या पहिल्या टप्प्याला भारतामध्ये अभूतपूर्व आणि दमदार यश मिळाले.*

*गुजरात, उत्तर प्रदेश, पंजाब, आसाम, ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये आतापर्यंत जवळपास १२ मोठ्या सेमीकंडक्टर प्रकल्पांना अधिकृत मंजुरी दिली आहे. यामध्ये सिलिकॉन फॅब, डिस्प्ले फॅब, कंपाऊंड सेमीकंडक्टर, पॅकेजिंग आणि इतर अत्यंत उच्च तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्पांचा समावेश आहे. या सर्व अनुमोदित प्रकल्पांच्या माध्यमातून भारतामध्ये एकूण १.६४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची विक्रमी गुंतवणूक केली जात आहे. टाटा समूह गुजरातच्या धोरणात्मक क्षेत्रामध्ये देशातील सर्वात पहिली आधुनिक सेमीकंडक्टर फॅब उभारण्याचे ऐतिहासिक काम करत आहे. याशिवाय, अमेरिकेच्या प्रसिद्ध क्येन्स सेमीकंडक्टर कंपनीनेदेखील आसाममध्ये आपले नवीन सेमीकंडक्टर युनिट उभारण्यासाठी पावले उचलली आहेत. तज्ज्ञांच्या मते, येत्या २०२६ च्या उत्तरार्धापर्यंत या सर्व प्रकल्पांमधून प्रत्यक्ष व्यावसायिक उत्पादन सुरू होईल, अशी दाट शक्यता वर्तवली जात आहे.*

*या संपूर्ण प्रवासात आता सुरू झालेला 'सेमीकंडक्टर इंडिया २.०' हा नवीन टप्पा पूर्वीच्या तुलनेत अधिक महत्त्वाकांक्षी आणि व्यापक आहे. सरकारच्या मते, पहिल्या टप्प्याचा उद्देश भारताला केवळ एक फॅब्रिकेशन हब बनवण्याचा होता; परंतु आता दुसऱ्या टप्प्यात सरकारला संपूर्ण सप्लाय चेनमध्ये जागतिक पातळीवर सर्वोच्च स्थान मिळवायचे आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती-तंत्रज्ञान सचिव एस. कृष्णन यांनी स्पष्ट केले आहे की, आता केवळ फॅक्टरी लावण्यापुरते मर्यादित न राहता, चिप डिझाईन, निर्माण, डव्हान्स्ड पॅकेजिंग, संशोधन, उपकरणनिर्मिती आणि उच्च दर्जाची प्रतिभा विकसित करून एक मजबूत औद्योगिक परिसंस्थेचे जाळे निर्माण करावे लागणार आहे. नव्या धोरणामुळे भारताला हार्डवेअर निर्मितीचे केंद्र बनवण्याबरोबरच जागतिक स्तरावर डिझाईन सेवा पुरवणारे एक प्रमुख बौद्धिक संपत्ती (आयपी) आधारित ठिकाण बनवण्याचे मोठे ध्येय ठेवले आहे. सरकारचे असे स्पष्ट मत आहे की, भारतीय कंपन्यांनी स्वतःचे डिझाईन केलेले प्रोसेसर, मायक्रोकंट्रोलर आणि विशेष उपयोगासाठी लागणाऱ्या चिप्स विकसित केल्या पाहिजेत, ज्यांचा उपयोग अंतराळ, दूरसंचय, ऑटोमोबाईल आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या अत्यंत संवेदनशील क्षेत्रांमध्ये होऊ शकेल. याद्वारे विदेशी तंत्रज्ञानावर असणारी भारताची जुनी मदार पूर्णपणे संपुष्टात येईल आणि देशातील उदयोन्मुख कंपन्यांना जागतिक बाजारपेठेत आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी सुवर्णसंधी उपलब्ध होईल.*

*या संपूर्ण धोरणाचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे आता सेमीकंडक्टर तयार करण्यासाठी लागणाऱ्या मशिनरी, विविध प्रकारची रसायने आणि विशेष वायूदेखील भारतातच उत्पादित केले जाणार आहेत. सेमीकंडक्टरच्या निर्मितीसाठी केवळ फॅब्रिकेशन युनिटस् चालवणे पुरेसे नसते, तर त्यासाठी अतिशुद्ध सिलिकॉन वेफर, स्पेशल गॅसेस, फोटोरेसिस्ट, सिलिकॉन वेफर आणि इतर अनेक रासायनिक सामग्रीची नितांत आवश्यकता असते. आतापर्यंत या सर्व गोष्टींसाठी भारत प्रामुख्याने कोरिया, तायवान, जपान आणि अमेरिका यांसारख्या देशांवर पूर्णपणे अवलंबून होता; परंतु 'सेमीकंडक्टर इंडिया २.०' अंतर्गत या कच्च्या मालाच्या उत्पादनाला देशातच प्रोत्साहन दिले जात आहे, ज्यामुळे भारताची जागतिक पुरवठा साखळी अधिक मजबूत होईल आणि परदेशी चलनाची मोठी बचतदेखील साधता येईल.*

*या संपूर्ण मोहिमेच्या यशस्वीतेसाठी सरकारने डिझाईन लिंक्ड इन्सेंटिव्ह (डीएलआय) योजनेअंतर्गत स्टार्टअप्स आणि एमएसएमई प्रकल्पांना भरभक्कम आर्थिक मदत आणि अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक डिझाईन ऑटोमेशन (ईडीए) टूल्स विनामूल्य उपलब्ध करून दिले आहेत. यामुळे आता देशातील लहान स्टार्टअप्स आणि तरुण अभियंते स्वतःच्या अत्याधुनिक चिप्स आणि सिस्टीम ऑन चिप डिझाईन करू शकत आहेत. याशिवाय, स्टार्टअप्सच्या माध्यमातून देशातील ३१५ हून अधिक विद्यापीठांमध्ये सेमीकंडक्टर डिझाईनचे प्रशिक्षण आणि उद्योग स्तरावरील व्यावसायिक सॉफ्टवेअर मोफत उपलब्ध करून दिले गेले आहेत. मोहाली येथील सेमीकंडक्टर लॅबचे आधुनिकीकरण केले जात असून, तेथे हजारो विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना प्रत्यक्ष चिप्सची चाचणी आणि प्रोटोटाईप तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. भारताने या क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती केली असली, तरी आंतरराष्ट्रीय स्तरावरील आव्हाने अद्याप पूर्णपणे संपलेली नाहीत. तज्ज्ञांच्या मते, केवळ आर्थिक सहाय्य देऊन या स्पर्धेत टिकून राहणे शक्य होणार नाही. सेमीकंडक्टर उद्योगाच्या प्रगतीसाठी सतत वीजपुरवठा, मोठ्या प्रमाणावर शुद्ध पाण्याची उपलब्धता, उच्च दर्जाची पायाभूत सुविधा, मजबूत लॉजिस्टिक्स आणि स्थिर धोरणात्मक व करविषयक वातावरण असणे अत्यंत गरजेचे आहे. तायवान, दक्षिण कोरिया आणि अमेरिका यांसारख्या देशांकडे या क्षेत्रात अनेक दशकांचा दांडगा अनुभव आहे. त्यामुळे भारताला जागतिक पातळीवर त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी मोठी गुंतवणूक आणि सातत्य ठेवावे लागणार आहे.*

# चिखलदऱ्यात पावसाळी पर्यटनाचा विकेंड

## चार महिन्यांत १ लाख ३७ हजार पर्यटकांची हजेरी

**विदर्भप्रजासत्ताक**
**दि.१० चिखलदरा-**
विदर्भाचे पर्यटनस्थळ म्हणून ओळख असलेल्या चिखलदऱ्यात यंदाच्या पावसाळ्यात पर्यटकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. एप्रिल ते जुलै या चार महिन्यांच्या कालावधीत तब्बल १ लाख ३७ हजार पर्यटकांनी चिखलदऱ्याला भेट दिल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे जुलै महिन्यात पावसाळी वातावरणाचा आनंद घेण्यासाठी लाखापेक्षा अधिक पर्यटकांनी चिखलदऱ्याची वाट धरली.चिखलदऱ्यातील हिरवाई, धबधबे, डोंगरदऱ्या, आल्हाद दायक वातावरण आणि पावसाळ्या त निसर्गाचे बदलणारे रूप पर्यटकांना आकर्षित करत आहे. त्यामुळे यंदाच्या पावसाळी पर्यटन हंगामात चिखलदऱ्यातील विविध पर्यटनस्थळांवर विकेंडला मोठी गर्दी होत आहे.एप्रिलपासून सुरू झालेल्या पर्यटन हंगामाला जून-जुलैमध्ये चांगला प्रतिसाद मिळाला. जुलै महिन्यात तर पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. शनिवार-रविवारसह सुटीच्या दिवशी



### जुलैमध्ये विक्रमी गर्दी; नगरपालिकेच्या तिजोरीत २३ लाखांहून अधिक महसूल

चिखलदऱ्यातील प्रमुख पर्यटनस्थळे पर्यटकांनी गजबजून जात असल्याचे चित्र आहे.पर्यटकांच्या वाढत्या संख्येचा थेट फायदा स्थानिक अर्थव्यवस्थेलाही होत आहे. हॉटेल, लॉजिंग, खाद्यपदार्थांचे स्टॉल, स्थानिक वाहतूक तसेच विविध पर्यटन व्यवसायांना चांगला रोजगार मिळत आहे. याशिवाय चिखलदरा नगरपालिकेच्या महसुलातही वाढ झाली असून, एप्रिल ते जुलै या कालावधीत नगरपालिकेच्या तिजोरीत २३ लाखांहून अधिक रुपयांचा महसूल जमा झाला आहे.पावसाळ्यात चिखलदऱ्याचे सौंदर्य अधिक खुलून येत असल्याने आगामी काळातही पर्यटकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पर्यटनस्थळांवरील स्वच्छता, वाहतूक व्यवस्था, पार्किंग आणि सुरक्षेच्या उपाययोजनांकडे प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.दरम्यान, पावसाळी पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, धोकादायक ठिकाणी जाणे टाळावे आणि निसर्ग संवर्धनाला हातभार लावावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# तिवसाघाट येथे विदेशी संत्रा कलमांची लागवड



### वातावरणीय बदलावर मात करण्यासाठी शेतकऱ्याचा सहा एकरात नवीन प्रयोग

**विदर्भा प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**
वातावरणीय बदल, अवेळी पाऊस आणि वाढत्या रोगराईमुळे संत्रा-मोसंबी पिकांच्या उत्पादनावर परिणाम होत असताना तालुक्यातील तिवसाघाट येथील प्रयोगशील संत्रा उत्पादक व उद्यानपंडित पुरस्कारप्राप्त शेतकरी उद्धव फुटाणे यांनी विदेशी प्रजातींच्या संत्रा-मोसंबी कलमांची प्रायोगिक तत्त्वावर लागवड केली आहे.

उद्धव नर्सरीच्या माध्यमातून गेल्या ३० वर्षांपासून लिंबूवर्गीय पिकांच्या कलमांवर विविध प्रयोग करणाऱ्या फुटाणे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा प्रयोग हाती घेतला आहे. शेती व्यवसायावर वातावरणीय बदल व अस्मानी संकटांचे परिणाम वाढत असल्याने संत्रा-मोसंबी पिकाची शाश्वती राहिलेली नाही. अवेळी पाऊस, रोगराई आणि बदलत्या हवामानामुळे उत्पादनात होणारी घट लक्षात घेता शेतकऱ्यांनी पीक पद्धतीत बदल करण्यास सुरवात केली आहे.


त्याच पार्श्वभूमीवर फुटाणे यांनी युरोपातील विविध देशांसह अमेरिकेतील कॅलिफोर्निया येथून संत्रा-मोसंबीच्या विदेशी प्रजाती आणून त्यांची लागवड केली आहे. सुमारे साडेसहा एकर क्षेत्रात एकरी ३० ते ४० टन उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवून एकूण १२३९ संत्रा-मोसंबी कलमांची तांत्रिक पद्धतीने लागवड करण्यात आली आहे. कलमांची लागवड १२ बाय २० फूट अंतरावर करण्यात आली असून, चार फूट उंच व आठ फूट रुंद बेड तयार करून त्यावर दर्जेदार मल्चिंग शीटचा वापर करण्यात आला आहे. ठिबक सिंचनासोबतच खतांचा पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात आली आहे. तसेच अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्यासाठी ड्रेनेजची व्यवस्था करण्यात आली आहे. या बागेत संत्र्याच्या चार आणि मोसंबीच्या चार विदेशी प्रजातींच्या कलमांची प्रायोगिक तत्त्वावर लागवड करण्यात आली आहे. वातावरणीय बदलाच्या परिस्थितीत या प्रजातींची वाढ, उत्पादन क्षमता व रोगप्रतीकारकता यांचा अभ्यास करून त्यातून संत्रा उत्पादकांना पर्यायी दिशा मिळण्याची अपेक्षा आहे. फुटाणे यांच्या या प्रयोगाकडे तालुक्यातील संत्रा उत्पादकांचे लक्ष लागले आहे.

# विना निविदाच झाले महापौर कक्षाचे नूतनीकरण

## महापालिकेत संशय, कल्लोळला सुरुवात

**विदर्भा प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**-निविदा प्रक्रिया न करताच महापौर कक्षाचे करण्यात आलेले नूतनीकरण आता वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. नूतनीकरणासाठी नेमके किती रुपये खर्च करण्यात आले, याचा हिशेब मनपातील बांधकाम विभागाकडे नसल्याने व त्यास कुणाची मंजुरी घेण्यात आली, हे स्पष्ट नसल्याने आर्थिकदृष्ट्या कंगाल असलेल्या महापालिकेने हा खर्च कोणत्या शीर्षातून केला? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. यासोबतच झालेल्या खर्चाचे देयक कसे देणार? असाही प्रश्न विचारल्या जाऊ लागला आहे.

वर्ष २०२२ मध्ये तत्कालीन सभागृहाची मुदत संपल्यानंतर प्रशासकीय राजवटीत महापौर कक्षाचा वापरच केल्या गेला नाही.



२०२४ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत सभागृह अस्तित्वात आल्यानंतर पदाधिकाऱ्यांच्या कक्षांसह महापौर कक्षाचे नूतनीकरण युद्धपातळीवर करण्यात आले. तथापि प्रशासकीय राजवटीत सर्वसाधारण सभेच्या सभागृहासह अधिकाऱ्यांचे व विविध विभागांच्या कक्षांच्या नूतनीकरणावर वारेमाप खर्च करण्यात आला. सभागृह अस्तित्वात आल्यानंतर महापौर कक्षाचे नूतनीकरण करण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात आले असून शुक्रवारी त्याचे उद्घाटन पार पडले. नूतनीकरणाचे आदेश स्वतः महापौरांनी दिल्याचे सांगण्यात येत आहे. काम पूर्ण होईस्तोवर त्यांनी त्यांचे कार्यालय स्थायी समितीच्या सभागृहात थाटले होते.

> महापौर कक्षाच्या नूतनीकरणाचे काम कुणाच्या आदेशाने झाले हे मला सद्या माहीत नाही. मी नुकताच शहर अभियंता पदावर रूजू झालो आहे. बांधकाम विभागातील कामकाजाची अद्याप पुरेशी माहिती मला नाही. निविदाप्रक्रिया झाली किंवा अन्य कोण्या शीर्षातून हे काम केल्या गेले, हे तपासून सांगता येईल, त्यासाठी थोडा अवधी लागणार आहे. **श्रीधर कांबळे,** शहर अभियंता, मनपा.

शुक्रवारी स्वतःच्या वाढदिवसाचे औचित्य साधत त्यांनी आलिशान कक्षाचे उद्घाटन केले व आपला ठिय्या या कक्षात हलविला. महापालिकेस साजेसे कक्ष तयार करण्यात आले असले तरी त्यावर झालेला खर्च किती झाला, यावर अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. महापालिकेत कोणतेही काम करण्यापूर्वी संबंधित यंत्रणेकडून मंजुरी घ्यावी लागते. या नूतनीकरणासाठी मात्र हा नियम डावलण्यात आल्याची चर्चा आहे. लाखो रुपये खर्चाच्या कामासाठी निविदाप्रक्रिया करण्यात आलेली नाही, हे वास्तव आहे. आपल्याला यासंदर्भात काहीच माहिती नाही, असे उत्तर शहर अभियंता कांबळे यांनी दिले आहे. तर, कार्यकारी अभियंता रवींद्र पवार यांनी हे काम माझ्याकडे नसल्याने मला त्याबद्दल माहितीच नाही, असे मोघम उत्तर देत बोलणे टाळले आहे. विना निविदा कंत्राटदाराने काम केले असले तरी आता त्याच्या देयकाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. तो कोणत्या शीर्षातून दिल्या जाणार आहे, असा प्रश्न अनेकांनी उपस्थित केला आहे. नूतनीकरणास आक्षेप नाही, मात्र त्यासाठी अवलंबण्यात आलेली पद्धत योग्य नाही असा आक्षेप नोंदविण्यात येत आहे. दरम्यान, अमरावती महापालिकेच्या महापौरांचे दालन कार्पोरेट कंपनीच्या सीईओच्या कक्षालाही लाजवणारे असून फाइव्ह स्टार रेटिंगचे झाले आहे.

# रस्त्यांवरील झाडांच्या छाटलेल्या फांद्या बेवारस

## महापालिकेच्या दिरंगाईमुळे नागरिक त्रस्त

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**
अमरावती शहरातील मुख्य आणि अंतर्गत रस्त्यांवर झाडांची छाटणी केल्यानंतर कचरा उचलण्याकडे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून दुर्लक्ष होत आहे. यामुळे नागरिक त्रस्त झाले असून, रस्त्याच्या कडेला पडलेल्या डहाळ्या, पाने आणि फांद्यांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे, तसेच अपघाताचा धोकाही वाढला आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर किंवा नियमित देखभालीचा भाग म्हणून मनपाच्या वृक्ष प्राधिकरणातर्फे रस्त्यांवरील झाडांच्या धोकादायक फांद्या छाटण्याचे काम हाती घेतले जाते. मात्र, झाडे किंवा फांद्या तोडल्यानंतर तो कचरा तात्काळ हटवणे आवश्यक असताना, मनपा कर्मचारी छाटलेली पाने-फांद्या रस्त्यावरच सोडून निघून जातात.पालिका कर्मचाऱ्यांच्या मते, झाडांच्या वाढलेल्या फांद्या तोडण्याचे काम एका यंत्रणेकडे आहे, तर तोडून झाल्यावर रस्त्यात साचणारा कचरा उचलण्याचे काम दुसऱ्या यंत्रणेकडे आहे. यामुळे फांद्या आणि पाने तोडल्यानंतर तयार झालेला कचरा लगेच उचलला जात नाही.गेल्या दोन-तीन दिवसांपासून अमरावती-बडनेरा मार्गासह रेल्वे स्टेशन चौक-एसटी स्टँड रस्त्याच्या दुभाजकांतील झाडांच्या फांद्या व पाने कापण्याचे काम सुरू आहे. मात्र, त्यातून निर्माण झालेला कचरा अद्यापही तसाच पडून आहे.झाडांची छाटणी करणे आवश्यक असले तरी, त्यासोबतच कचरा तात्काळ उचलण्याची जबाबदारीही महापालिकेची आहे, असे त्रस्त नागरिकांनी म्हटले आहे. काम अर्धवट सोडून



दिल्याने नागरिकांनाच मनस्ताप सहन करावा लागत असून, मनपा प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ हा कचरा हटवावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.रस्त्यांच्या कडेला पडून असलेल्या या फांद्यांमुळे आधीच अरुंद असलेले रस्ते अधिकच संकुचित झाले आहेत. रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश नसल्यास दुचाकीचालक या फांद्यांवर आदळून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत. तसेच वाळलेल्या पानांमुळे आणि फांद्यांमुळे पादचाऱ्यांना चालणेही कठीण झाले आहे.

अनेक दिवस हा कचरा असाच पडून राहिल्याने तो कुजण्यास सुरुवात होते. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असून, डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसाच्या पाण्यात या फांद्या आणि पाने वाहून नाल्यांमध्ये अडकल्यास नाले तुंबून रस्त्यावर पाणी साचण्याच्या घटनांमध्येही वाढ होत आहे.

# पवित्र पोर्टलची गती मंदावली

## भावी शिक्षकांची वाढली धाकधुक

### : मुदतवाढ देण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती-**
शासनाच्या पवित्र पोर्टलद्वारे राबविण्यात येत असलेल्या शिक्षक मेगा भरतीप्रक्रियेतील पसंतीक्रम नोंदवून शाळा निवड व लॉक करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. मात्र ऐन भरतीप्रक्रियेच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पोर्टलची साईट मंदावली असून वारंवार ठप्प होत असल्याने हजारो टीएआयटी उत्तीर्ण व पात्र उमेदवारांची मोठी गैरसोय होत आहे. शाळा निवडप्रक्रियेसाठी अवघे दोनच दिवस शिल्लक राहिल्याने वेळेत प्रक्रिया पूर्ण होईल की नाही, याची चिंता भावी शिक्षकांना सतावत आहे. शिक्षक भरतीच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो उमेदवारांसाठी शासनाने पवित्र पोर्टलच्या माध्यमातून भरतीप्रक्रिया सुरू केल्याने मोठा दिलासा मिळाला आहे. शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे राज्यातील अनेक शाळांमध्ये अध्यापनावर परिणाम होत असून, अपुऱ्या शिक्षक संख्येमुळे कार्यरत शिक्षकांवरील कामाचा ताणही वाढला आहे. अशा परिस्थितीत ही मेगा भरतीप्रक्रिया महत्त्वपूर्ण मानली जात आहे. पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरतीप्रक्रियेत सहभागी होण्यासाठी उमेदवारांना आपल्या पात्रतेनुसार व पसंतीक्रमानुसार शाळांची निवड करून ती लॉक करणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया ११ ऑगस्टपर्यंत पूर्ण करायची आहे. त्यामुळे हजारो उमेदवार संगणक केंद्रे व सायबर कॅफेमध्ये गर्दी करीत आहेत. मात्र पोर्टल संथगतीने चालणे, वारंवार तांत्रिक अडचणी निर्माण होणे तसेच पसंतीक्रम भरल्यानंतर लॉक प्रक्रिया पूर्ण न होणे, यामुळे उमेदवारांना तासन् तास प्रतीक्षा करावी लागत आहे. अनेकांना संगणक केंद्रांच्या वारंवार चकरा माराव्या लागत असून, वेळ आणि पैशाचे नुकसान सहन करावे लागत आहे. प्रक्रियेसाठी आता केवळ एकच दिवस शिल्लक असल्याने तांत्रिक अडचणींमुळे काही उमेदवारांची शाळा निवडप्रक्रिया अपूर्ण राहिल्यास त्यांना भरतीप्रक्रियेत नुकसान होण्याची भीती आहे. त्यामुळे शासनाने परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून शाळा निवड व लॉक प्रक्रियेसाठी मुदतवाढ द्यावी, अशी मागणी भावी शिक्षकांकडून जोर धरत आहे.

> कोणत्याही विद्यार्थ्याचे नुकसान होता कामा नये. पोर्टलवरील समस्या निकाली काढण्यासह विद्यार्थ्यांना वाढीव वेळ देणे आवश्यक आहे. याकरिता तातडीने पोर्टल समस्या, शाळा पसंतीक्रम लॉक करण्यासाठी व वाढीव वेळ मिळण्यासाठी संबंधित मंत्रीमहोदयांकडे पाठपुरावा करणार.
> **-निखिल ठाकरे,** प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना भारतरत्न द्या

## तिवस्यात बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू

### क्रांतीदीनी मशाल पेटवून आंदोलनाला सुरवात



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०तिवसा–** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' देण्याच्या मागणीसाठी क्रांती दिनाचे औचित्य साधून तिवसा तहसील कार्यालय परिसरात बेमुदत अन्नत्याग व साखळी उपोषणाला सुरुवात करण्यात आली. गुरुदेव भक्तांच्या नेतृत्वाखाली क्रांतीज्योत व मशाल पेटवून आंदोलनाचा शुभारंभ करण्यात आला. 'राष्ट्रसंतांना भारतरत्न, एकच लक्ष' असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.भारतरत्न देण्याची घोषणा होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशारा आंदोलकांनी दिला. यावेळी मुकुंद पूनसे, जयकुमार बोके, रमेशराव बोके, हैबतराव गाडगे, शफीक शाह, मनोहराव साबळे व जगणराव साबळे उपोषणाला बसले आहेत.आंदोलनाचे संचालन विजयराव बोके यांनी केले. यावेळी प्रा. प्रकाश बोके, प्रा. नरेंद्र राऊत, महादेव गरपवार, सागर भोवते, आसावरी देशमुख, अभिजित बोके, प्रल्हाद पारिसे, अमर वानखडे, अनिल नांदणे, अशोक माहुरे, विनायक केणे, नरेश भोयर, मोहन अग्रवाल, अनिल काळमेघ, गौरव चौधरी, कार्यवाहक प्रशांत कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने गुरुदेव भक्त उपस्थित होते.

# मध्यान्ह भोजन योजनेला धान्यटंचाईचा फटका

## जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक शाळांमध्ये उसनवारीवर स्वयंपाक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** शैक्षणिक वर्ष सुरू होऊन महिनाभराहून अधिक कालावधी लोटला असतानाही अमरावती जिल्ह्यातील अनेक शाळांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (मध्यान्ह भोजन) योजनेसाठी आवश्यक धान्य व इतर साहित्याचा नियमित पुरवठा झालेला नाही. परिणामी, जिल्ह्यातील निम्म्याहून अधिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे मध्यान्ह भोजन बंद पडू नये म्हणून मुख्याध्यापकांना स्थानिक व्यापाऱ्यांकडून उसनवारीवर धान्य घेऊन स्वयंपाकाची व्यवस्था करावी लागत असून, आर्थिक व प्रशासकीय ताणही वाढला आहे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण (मध्यान्ह भोजन) योजना इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येते. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना शाळेत नियमित उपस्थिती ठेवण्याबरोबरच त्यांना पौष्टिक आहार मिळावा, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

मात्र, यंदा शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतरही आवश्यक धान्य आणि इतर साहित्य वेळेत उपलब्ध न झाल्याने अनेक शाळांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे. भातकुली, अमरावती, चिखलदरा, धारणी आदी तालुक्यांतील अनेक शाळांना केवळ तांदूळ उपलब्ध करून देण्यात आला आहे. मात्र डाळी, कडधान्य, खाद्यतेल, मसाले, मीठ आणि इतर आवश्यक साहित्य अद्याप पोहोचले नसल्याची माहिती शाळांकडून देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना निर्धारित मेनूनुसार भोजन देणे कठीण झाले असून काही ठिकाणी मर्यादित साहित्यावरच भोजन तयार केले जात आहे. योजनेंतर्गत भाजीपाला खरेदीसाठी मिळणारा निधीही वेळेवर उपलब्ध होत नसल्याची तक्रार मुख्याध्यापकांनी केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना सकस व पौष्टिक आहार देण्यासाठी शाळांना



अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे. भाजीपाला व किराणा खरेदीसाठी आगाऊ निधी उपलब्ध करून देण्याची मागणी शाळांकडून करण्यात येत आहे.

शिक्षण विभागाकडून धान्याचा पुरवठा वेळेत होणे अपेक्षित असताना अनेक शाळांना अद्यापही पुरेसा साठा मिळालेला नाही. यामुळे भोजनाचे नियोजन विस्कळीत होत असून विद्यार्थ्यांच्या पोषणावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः दुर्गम आणि आदिवासी भागातील शाळांमध्ये ही समस्या अधिक तीव्र असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, जिल्ह्यातील ५० टक्क्यांहून अधिक शाळांमध्ये अशीच परिस्थिती असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे धान्य व आवश्यक साहित्याचा पुरवठा तातडीने सुरळीत करावा, भाजीपाला खरेदीसाठी आगाऊ निधी उपलब्ध करून द्यावा तसेच स्वयंपाकी व मदतनिसांच्या मानधनात वाढ करावी, अशी मागणी मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांकडून करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना नियमित, दर्जेदार व पौष्टिक मध्यान्ह भोजन मिळणे ही शासनाची जबाबदारी असून पुरवठा साखळीतील विलंबामुळे या योजनेच्या उद्दिष्टालाच तडा जाऊ नये, अशी अपेक्षा शिक्षक व पालकांनी व्यक्त केली आहे.

### शिक्षकांच्या खिशातून खर्च


विद्यार्थ्यांचे भोजन खंडित होऊ नये म्हणून अनेक मुख्याध्यापकांनी स्थानिक किराणा दुकानदारांकडून उसनवारीवर धान्य व अन्य साहित्य घेऊन योजना सुरू ठेवली आहे. काही ठिकाणी शिक्षकांनीही स्वतःच्या खिशातून खर्च करून आवश्यक साहित्य खरेदी केल्याचे सांगितले जात आहे. मात्र, ही व्यवस्था तात्पुरती असून शासनाकडून पुरवठा वेळेत न झाल्यास शाळांसमोरील अडचणी अधिक वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# अमली पदार्थविरोधी अभियानांतर्गत अमरावतीत भव्य विदर्भस्तरीय सायकल स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती :**

अमरावती सायकल असोसिएशन, दिशा संस्था आणि हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, सायकल असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या मान्यतेने तृतीय विदर्भस्तरीय भव्य सायकल स्पर्धा उत्साहात पार पडली. अमली पदार्थविरोधी अभियानांतर्गत अमरावती शहर पोलीस मुख्यालयाच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.स्पर्धेत १२, १५ आणि १८ वर्षांखालील मुले–मुली, खुला व ४० वर्षांवरील पुरुष–महिला अशा विविध गटांचा समावेश होता. एकूण ३८५ स्पर्धकांनी ५० किलोमीटर अंतराच्या या स्पर्धेत सहभाग घेतला. स्पर्धकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत हेल्मेट सक्तीचे करण्यात आले होते. तसेच प्रथमोपचार, तज्ज्ञ वैद्यकीय पथके आणि रुग्णवाहिकांची व्यवस्था करण्यात आली होती.स्पर्धेचा फ्लॅग ऑफ राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा, नितीन धांडे, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त प्रांजली सोनवणे, डॉ. पराग नवलकर यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.१२ वर्षांखालील मुलांमध्ये चिराग खोकले, यश धानोरकर व श्रीतेज भोयर, तर मुलींमध्ये राजलक्ष्मी मोहळे, प्रांजल मार्कंडे व खुशाली हनवते यांनी अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक पटकावले. १५



वर्षांखालील मुलांमध्ये अंशुमन ठाकरे, मोहित गिरी, अनय बगाडे, तर मुलींमध्ये क्षितिजा बुंदेले, मनवा पाबळे व लावण्या घाडगे विजेते ठरले.१८ वर्षांखालील मुलांमध्ये श्रेयांश राऊत, सुजल कोहळे व परम खोरगडे, तर मुलींमध्ये रुचिका वासनिक, प्राची इंगळे व श्रेयांश झाडे यांनी बाजी मारली. खुल्या पुरुष गटात राजेश जाधव, विवेक पवार व प्रणय लांजेवार, तर महिलांमध्ये वृषाली काळबांडे व प्रिन्सेस रामावत यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. ४० वर्षांवरील पुरुषांमध्ये प्रशांत काळबांडे, केशव निकम व रमेश विठोरे, तर महिलांमध्ये वर्षा सदार, दीपमाला साळुंखे व दिव्या मेश्राम यांनी प्रथम तीन क्रमांक मिळवले.विजेत्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. स्पर्धा पूर्ण करणाऱ्या सर्व स्पर्धकांना फिनिशर मेडल व ई–सर्टिफिकेट, तसेच नोंदणीकृत स्पर्धकांना टी–शर्ट देण्यात आला. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या ६५ स्वयंसेवकांसह वाहतूक शाखा, वैद्यकीय पथके व अमरावती सायकलिंग असोसिएशनच्या सदस्यांनी परिश्रम घेतल्याने स्पर्धा कोणतीही दुर्घटना न होता यशस्वीरीत्या पार पडली.

# जिल्ह्यात पावसाचा ब्रेक ... धरणांत निम्मा जलसाठा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती –** जुलैच्या अखेरीस झालेल्या धुव्वांधार पावसाने या महिन्यात विश्रांती घेतली आहे. जिल्ह्यात एक जूनपासून आतापर्यंत अपेक्षित पावसाच्या तुलनेत सरासरी ७८ टक्के पाऊस झाला असून धरणे अद्याप पूर्णतः भरलेली नाहीत. मोठे, मध्यम व लघुप्रकल्पांत ५५ टक्के जलसाठा झाला आहे. नदी–नाल्यांचेही पात्र पुरेसे भरलेले नाहीत. त्यामुळे आगामी दीड महिन्यात सरासरी इतका पाऊस न झाल्यास जिल्ह्यावरील जलसंकटाची छाया अधिक गडद होणार आहे. पावसाच्या पाण्यावर सिंचन प्रकल्पातील जलसाठा अवलंबला आहे. तर सिंचन प्रकल्पातील जलसाठ्यावर पिण्याचा पाणीपुरवठा व सिंचनासह औद्योगिक वसाहतींचा पुरवटा अवलंबून आहे. एक जून ते नऊ ऑगस्ट, या कालावधीत जिल्ह्यात ४९६ मिमी सरासरी पावसाची अपेक्षा आहे. त्या तुलनेत या कालावधीत प्रत्यक्षात ३८७ मिमी पाऊस झाला असून त्याचे प्रमाण सरासरी ७८ टक्के आहे. यंदा 'एल निनो'च्या प्रभावाने मॉन्सून कमजोर झाला असल्याने पर्जन्यमानाची सरासरी कमी राहण्याचा अंदाज



हवामान खात्याने वर्तविला होता. जून व जुलै या पावसाच्या पहिल्या दोन महिन्यांत ८८ टक्के पाऊस झाला आहे. अपेक्षित ४२३ मिमीच्या तुलनेत ३७३ मिमी पाऊस प्रत्यक्षात झाला असून तूट कायम आहे. ऑगस्टमधील पहिले नऊ दिवस जवळपास कोरडे गेले आहेत. या नऊ दिवसांत जिल्ह्यात सरासरी १४ मिमी पाऊस झाला असून त्याचे अपेक्षित पर्जन्यमानाच्या तुलनेत प्रमाण १९ टक्के आहे. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाची हजेरी दमदार स्वरूपाची नसल्याने सिंचन प्रकल्पांतील जलपातळी व साठा वाढू शकलेला नाही. जिल्ह्यात एक मोठा, सात मध्यम व ४८ लघू, असे ५६ सिंचनप्रकल्प आहेत. या प्रकल्पातील जलसाठ्यावर शहरी व ग्रामीण पाणीपुरवठा योजनेसह सिंचन आणि औद्योगिक वसाहतींचा पुरवठा अवलंबून आहे. सद्यस्थितीत एकूण सिंचन प्रकल्पांत ५७९ दलघमी जलसाठा झाला आहे. एकूण प्रकल्पीय पाणीसाठ्याच्या तुलनेत तो ५५ टक्के आहे. ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये होणाऱ्या पावसावर सिंचन प्रकल्पातील साठा अवलंबून असतो. या महिन्यातील पहिले नऊ दिवस कोरडे गेले आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार १५ ऑगस्टपर्यंत पावसाचे प्रमाण अल्प प्रमाणांत राहणार आहे. त्यानंतर त्याची हजेरी कशी राहते, यावर सिंचन प्रकल्पांतील पाणीसाठ्याचे भविष्य अवलंबून आहे. या दीड महिन्यात पावसाने सरासरी न गाठल्यास आगामी काळात पाणीपुरवठ्यासह सिंचनासाठी अडचणी जाणार आहेत.

# मेळघाटात समग्र सेवा सन्मान सोहळा

## शेतकरी, आदिवासी आणि विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध

### किसान मोर्चाचे अध्यक्ष रामकृष्ण वेताळ



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०धारणी–** राज्य सरकारचे विशेष लक्ष आदिवासीबहुल मेळघाटाच्या सर्वांगीण विकासाकडे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि आदिवासी समाजाच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. शेतकऱ्यांसाठी वीजबिल सवलत, विविध आर्थिक अनुदाने, कर्जमाफीसह कृषी विकासाच्या योजना राबविण्यात आल्या असून, भविष्यातही मेळघाटाच्या विकासासाठी शासन कटिबद्ध राहील, असे प्रतिपादन प्रदेश किसान मोर्चाचे अध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजसेवेचा संदेश कृतीतून देत धारणी येथे 'समग्र सेवा सन्मान सोहळा' उत्साहात पार पडला. यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय प्रशिक्षण व शिक्षण प्रसारक मंडळ, धारणी तथा लक्ष्मीकांत (आप्पा) पाटील मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात विविध शासकीय विभागांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी तसेच पत्रकारांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला प्रदेश किसान मोर्चाचे अध्यक्ष रामकृष्ण वेताळ, मेळघाटचे आमदार केवलराम काळे, धारणीचे तहसीलदार प्रदीप शेवाळे, चिखलदऱ्याचे तहसीलदार जीवन मोराणकर, नायब तहसीलदार राजेश माळी, अनिल कुंडलवाल, विजय मेंढे, बाळासाहेब वानखडे, उमेश जाधव यांच्यासह आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास, महसूल, वन, महावितरण आणि कृषी विभागातील अधिकारी–कर्मचारी तसेच पत्रकार उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी वाढदिवस फटाक्यांची आतषबाजी, मिरवणुका किंवा अनावश्यक जल्लोष न करता समाजोपयोगी उपक्रम राबवून साजरा करण्याचे आवाहन केले होते.

त्याच विचारधारेतून आप्पा पाटील मित्रमंडळ व राष्ट्रीय प्रशिक्षण आणि शिक्षण प्रसारक मंडळाने समाजासाठी उत्कृष्ट सेवा देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याचा उपक्रम राबविला.

आमदार केवलराम काळे यांनी समाजासाठी प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि पत्रकारांचा सन्मान करणे ही प्रेरणादायी बाब असल्याचे सांगितले.

समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि प्रसारमाध्यमांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले.

# मनपा नगरसेवकांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा



## मनपा अधिनियम, सभाशास्त्र व समाज माध्यम व्यवस्थापनावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि१०अमरावती**

महापालिकेच्या कामकाजात लोकप्रतिनिधींची भूमिका अधिक प्रभावी, सक्षम आणि जबाबदार करण्याच्या उद्देशाने अमरावती महापालिका आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नगरसेवक व नगरसेविकांसाठी एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. डॉ. पंजाबराव देशमुख प्रबोधिनी सभागृहात ही कार्यशाळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन महापौर श्रीचंद तेजवानी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेते चेतन गावंडे, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, गटनेते नाना आमले, गटनेते डॉ. राजेंद्र तायडे, गटनेते शेख हमीद शेख वाहेद यांच्यासह महापालिकेचे नगरसेवक व नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तीन सत्रात पार पडलेल्या या प्रशिक्षण कार्यशाळेत पहिल्या सत्रात पुणे महापालिकेचे माजी सहाय्यक आयुक्त व नगरसचिव शिवाजीराव दौंडकर यांनी मार्गदर्शन केले. महापालिका अधिनियमातील विविध तरतुदी, लोकप्रतिनिधींचे अधिकार व जबाबदाऱ्या, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय, सभागृहातील प्रश्न मांडण्याची पद्धत तसेच महापालिकेच्या कामकाजाशी संबंधित महत्त्वाच्या कायदेशीर बाबी याबाबत मार्गदर्शन केले. लोकप्रतिनिधींनी कायद्याच्या चौकटीत राहून नागरिकांच्या प्रश्नांची प्रभावीपणे मांडणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींवरही त्यांनी प्रकाश टाकला. दुसऱ्या सत्रात सभा कार्यपद्धती, सभाशास्त्र व प्रश्न या विषयावर छत्रपती संभाजीनगर महापालिकेचे माजी नगरसचिव ड. महबूबखां पठाण यांनी मार्गदर्शन केले. महापालिकेच्या सभागृहातील कामकाज कशा पद्धतीने चालते, सभेतील नियमांचे पालन कसे करावे, विविध विषयांवर चर्चा करताना कोणत्या प्रक्रियेचे पालन करणे आवश्यक आहे, प्रश्न उपस्थित करताना कोणत्या बाबींची काळजी घ्यावी, तसेच सभागृहातील लोकप्रतिनिधींची भूमिका कशी असावी, याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. तिसऱ्या व अंतिम सत्रात नागपूर येथील वैभव काकडे यांनी समाजमाध्यमांवर लोकप्रतिनिधींनी आपले कार्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे कसे पोहोचवावे, नागरिकांच्या तक्रारी व सूचना कशा पद्धतीने हाताळाव्यात, डिजिटल माध्यमांचा सकारात्मक वापर कसा करावा आणि समाजमाध्यमांवर जबाबदारीने संवाद कसा साधावा, यासंदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# तिवसा नगरपंचायत क्षेत्रात पाच कोटींची विकासकामे

### आमदार राजेश वानखडे : विकासकामांचे भूमिपूजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०तिवसा–** तिवसा नगरपंचायत हद्दीतील 'नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा' या योजनेंतर्गत आमदार राजेश वानखडे यांचे विशेष प्रयत्नाने मंजूर पाच कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतील विकासकामांचे भूमिपूजन आमदार राजेश वानखडे यांच्या हस्ते करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने नगरपंचायत क्षेत्रातील विविध वॉर्डांमधील प्रमुख रस्ते सांडपाण्याचा निचरा होण्याकरिता काँक्रीट नाली व बहूद्देशीय सभागृह यांचा प्रामुख्याने समावेश आहे. या विकासकामांमुळे शहरातील रस्ते,



स्वच्छता व इतर मूलभूत नागरी सुविधांच्या उभारणीला गती मिळणार आहे. तिवसा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाच्या विविध योजनांचा प्रभावीपणे लाभ मिळवून अधिकाधिक विकासकामे मार्गी लावण्याचा संकल्प असल्याचे आमदार राजेश वानखडे यांनी यावेळी सांगितले. तिवसा शहराचा विकासकामांचा अनुशेष येत्या काळात मोठ्या प्रमाणात शासनाकडून निधी मंजूर करून भरून काढण्यात येईल, याबाबत उपस्थितांना आश्वासित केले.यावेळी परिसरातील नागरिक व पदाधिकाऱ्यांसह न. प. मुख्याधिकारी शिवदास मुसळे प्रामुख्याने उपस्थित होते.

# चौऱ्यागड दर्शनार्थींसाठी चार दिवस महाप्रसाद

## १४ ते १७ ऑगस्ट : 'जय भोले' महाभंडारा समिती सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०शेंदूरजनाघाट**

मध्य प्रदेशातील पचमढी येथील प्रसिद्ध चौऱ्यागडावर दर्शनासाठी येणाऱ्या हजारो शिवभक्तांसाठी शेंदूरजनाघाट येथील जय भोले भंडारा समितीच्या वतीने यंदाही महाभंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या १८ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेला हा सेवाभावी उपक्रम यावर्षी १४ ते १७ ऑगस्ट, या चार दिवसांत चौऱ्यागडाच्या पायथ्याशी राबविण्यात येणार आहे. दररोज सकाळी आठ वाजल्यापासून सायंकाळपर्यंत भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. यंदा महाप्रसादामध्ये पोळी, भाजी, भात, शिरा तसेच उपवास करणाऱ्या भाविकांसाठी साबुदाणा उसळीची व्यवस्था करण्यात आली आहे.

श्रावण महिन्यात नागपंचमीपूर्वी चौऱ्यागडावर लाखो शिवभक्त दर्शनासाठी येतात. या भाविकांच्या सेवेसाठी समितीने नियोजनाला वेग दिला असून शेंदूरजनाघाट येथील नगरपरिषद कम्युनिटी हॉलमध्ये गहू, तांदूळ, डाळ, साखर, रवा, खाद्यतेल, साबुदाणा आदी साहित्य तसेच रोख देणगी स्वीकारण्यास सुरवात झाली आहे. हा संपूर्ण उपक्रम लोकवर्गणी आणि दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने राबविला जात आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही चौऱ्यागडाच्या पहिल्या पायरीजवळ हजारो भाविकांना विनामूल्य महाप्रसाद दिला जाणार आहे. अनेक सेवेकरी सलग चार दिवस निःस्वार्थ भावनेने सेवा देणार असून समितीचे सदस्य गेल्या महिनाभरापासून नियोजनात व्यस्त आहेत. देणगी स्वीकारण्यासाठी शेंदूरजनाघाट नगरपरिषद कम्युनिटी हॉल येथे 'जय भोले भंडारा' कार्यालय सुरू करण्यात आले आहे.

# अमरावतीत कामगार-किसान मोर्चाचे 'जेलभरो'

## हजारो कामगार-शेतकरी रस्त्यावर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती :**
कामगार, कर्मचारी आणि शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी संयुक्त कामगार संघटना कृती समिती आणि संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार 'जेलभरो' आंदोलन करण्यात आले. चारही श्रमसंहिता रद्द करण्यासह तब्बल १६ मागण्यांसाठी केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात कामगार आणि शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने एकत्र येत सरकारचा निषेध केला.या आंदोलनात किमान ३० हजार रुपये वेतन लागू करावे, जुनी पेन्शन योजना पूर्ववत करावी, शेतमालाला हमीभाव द्यावा, कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घ्यावे, महागाईवर नियंत्रण आणावे, कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करावे आदी मागण्या करण्यात आल्या. तसेच चार श्रमसंहितांमुळे कामगारांचे अधिकार धोक्यात येत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आंदोलकांची मोठी गर्दी झाल्याने काही काळ वातावरण तणावपूर्ण बनले. विविध संघटनांचे पदाधिकारी, कामगार, कर्मचारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले. केंद्र सरकारच्या कामगार व शेतकरीविरोधी धोरणांविरोधात यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळावा, वाढती महागाई कमी करावी तसेच रोजगार आणि सामाजिक सुरक्षेच्या प्रश्नांकडे केंद्र सरकारने गांभीर्याने पाहावे, अशी मागणी आंदोलकांनी केली. शासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष न दिल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा संयुक्त कामगार संघटना कृती समिती आणि संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने देण्यात आला.मागण्या मान्य झाल्या नाहीत तर देशभर व्यापक जनआंदोलन उभारू, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. आंदोलनामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# निलंबीत पटवारी विपुल ठाकरेच्या घरावर फायरिंग

## दोन आरोपी अटकेत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती-**
शहरातील अर्जुन नगरच्या जिजाऊ कॉलनी परिसरातील निलंबीत पटवारी विपुल भानुदास ठाकरे यांच्या घरावर दोन अज्ञात आरोपींनी रविवारी रात्री उशिरा गोळ्या झाडल्या. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. ही घटना परिसरातील सिसीटीव्हीत कैदझाली आहे..सदर प्रकरणात दोन आरोपीनाअटक करण्यात आली आहे.

गाडगेनगर पोलिस स्टेशनच्या हद्दीतअर्जुन नगर परिसरात रविवारी रात्री ९-३० वाजताच्या सुमारास घडली. यावेळी घरात पत्नी शीतल ठाकरे, त्यांचा भाऊ आणि दोन मुले होती. अचानक घरासमोर फायरींगचा आवाज आल्याने खळबळ उडाली. शितल ठाकरे यांनी त्वरीत पोलिस कंट्रोल रुमला फोनकरुन माहिती दिली. प्राप्त माहितीनुसार, दोन बुर्काधारी आरोपींनी मोटरसायकलवर येऊन ठाकरे यांच्या घराच्या दिशेने फायरिंग केली. पहिल्याराऊंडनंतर दुसऱ्यांदा फायरींग होऊ शकली नाही. फायरिंगनंतर दोघेही आरोपी पसार झाले. घटनेनंतर एका मिनिटाने दोन्ही आरोपी पुन्हा ठाकरे यांच्याघरासमोर पोहचले. यावेळीमागे बसलेला आरोपी खाली उतरला आणि मुख्य गेटजवळ आला. त्याने बंदुकीने दुसऱ्यांदा फायर केले. नंतर दोघेही पळून केले. ही घटना काही मिनिटाच्या आत घडली. परंतु आरोपीने दुसऱ्यांदा फायरिंग करण्याचा प्रयत्न केला. परंतु यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण पसरले.

### सुनावणीच्या एक दिवस आधी फायरिंग

अवैध शस्त्रप्रकरणी विपुल ठाकरे याच्या जमानतीवर १० ऑगस्टला न्यायालयात सुनावणी होणार होती. परंतु सुनावणीच्या एक दिवस आधी म्हणजे रविवारी रात्री त्याच्या घरावर फायरिंग करण्यात आली. यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य अधिकच वाढले आहे. आरोपींचा विपुलठाकरेशी काय संबंध आहे, या दिशेने पोलिस तपास करीत आहेत. पथ्रोट पोलिस ठाण्यात अवैश शस्त्रप्रकरणी विपुल ठाकरेचे नाव आले होते. आरोपी अनिकेत रविंद्र महाजन याच्याजवळून एक देशी कट्टा, दोन मॅगझीन, तिन जिवंत काडतूस सापडले होते. त्याने सांगितले होते की, हे शस्त्र त्याने विपुल ठाक रेजवळून घेतले आहेत.

### अंगण, रस्त्यात मिळाले कारतूसचे खोके

पोलिसांना घटनास्थळी एक खोका घरासमोर आंगणात आणि दुसरा घराच्या बाहेर रस्त्यावर सापडला. प्रकरणाचे गांभीर्य पाहता फॉरेन्सीक टीमला पाचारण करण्यात आले. पेलिस आयुक्त राकेश ओला यांचयसह वरिष्ठ पोलिस अधिकारी घटनास्थळी पोहचले. शहरातील तिनही पोलिस आयुक्त तसेचक्राइम ब्रांचटीमने घटनास्थळाचेनिरिक्षणकेले. सिसीटीव्ही फुटेजच्या आधारे पुढील तपास सुरु करण्यात आला आहे. पोलिसांनी वेगवेगळ्या टीम बनवून आरोपींचा शोध घेण्यास सुरवात केली आहे.

## निखिल ठाकरे यांच्या प्रदेशाध्यक्षपदी निवडीनंतर अमरावतीत जल्लोषात स्वागत

# मतभेद विसरून संजय खोडके, सुरेखा ठाकरे यांनी एकत्र यावे - जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांची भावना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती :** राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काम करताना अंतर्गत गटबाजीचा फटका कार्यकर्त्यांना बसतो, हा अनुभव आपण स्वतः घेतला आहे. त्यामुळे आमदार संजय खोडके आणि राष्ट्रवादीच्या नेत्या सुरेखा ठाकरे यांच्यात जे काही मतभेद असतील, ते विसरून दोघांनीही एकत्र यावे आणि राष्ट्रवादीला अखंड ठेवून जिल्ह्यात मजबूत संघटन उभे करावे, अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांनी व्यक्त केली.राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदी निखिल ठाकरे यांची निवड झाल्यानंतर त्यांचे रविवारी प्रथमच अमरावतीत आगमन झाले. यानिमित्त त्यांच्या स्वागतासाठी कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. शहरात विविध ठिकाणी अभिवादन आणि स्वागत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.निखिल ठाकरे यांनी सर्वप्रथम इर्विन चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर पंचवटी चौकातील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याला अभिवादन करून गाडगेनगर येथील संत गाडगेबाबा यांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेतले. त्यानंतर त्यांच्या निवासस्थानी स्वागत समारंभ पार पडला.या कार्यक्रमाला राष्ट्रवादीच्या नेत्या सुरेखा ठाकरे, जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निखिल ठाकरे यांच्या नियुक्तीबद्दल कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत त्यांचे उत्स्फूर्त स्वागत केले.महात्मे म्हणाले, राष्ट्रवादीमध्ये काम करताना गटबाजीमुळे सामान्य कार्यकर्त्यांची चांगलीच पंचायत होते. पक्षाची ताकद ही कार्यकर्त्यांच्या एकजुटीत आहे. त्यामुळे नेतृत्वातील मतभेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. संजय खोडके आणि सुरेखा ठाकरे यांनीही मतभेद विसरून एकत्र बसावे आणि जिल्ह्यात राष्ट्रवादीचे मजबूत संघटन उभे करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



### निखिल ठाकरे भावुक झाले

आपल्या निवडीचा निर्णय दादांनी यापूर्वीच मला शब्द दिला होता. त्यामुळे ही निवड जवळपास वर्षभरापूर्वीच झाली असती, परंतु आज मला महाराष्ट्राची जबाबदारी मिळाली असताना दादा आज नाही अशी आठवण सांगताना निखिल ठाकरे भावुक झाले. पक्षाने दिलेली जबाबदारी ही केवळ पद नसून मोठी संघटनात्मक संधी असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### ठाकरे घराण्यावर पक्षाचा कायम विश्वास

: सुरेखा ठाकरेठाकरे घराण्याला राष्ट्रवादी काँग्रेसने आजवर संघटनात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या दिल्या असून, त्या आम्ही सक्षमपणे पार पाडल्या आहेत. आता निखिल ठाकरे यांच्यावर सोपविण्यात आलेली प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारीदेखील संघटनात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहे. ही जबाबदारी ते सक्षमपणे पार पाडतील, असा विश्वास सुरेखा ठाकरे यांनी व्यक्त केला.

### महाराष्ट्रभर युवक संघटना मजबूत करणार

: निखिल ठाकरेपक्षाने माझ्यावर सोपविलेली प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. महाराष्ट्रभर राष्ट्रवादी युवक काँग्रेसची संघटना आणखी मजबूत करण्यासाठी आपण काम करणार असून, पक्षाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरवून दाखवू, असा निर्धार निखिल ठाकरे यांनी व्यक्त केला.

# झाडे लागवडीत कोट्यवधींचा भ्रष्टाचार?

## निकृष्ट रोपांचा धक्कादायक प्रकार समोर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ दर्यापूर :** सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) दर्यापूर यांच्या वतीने दर्यापूर ते भातकुली मार्गावरील आसरा परिसरापर्यंत सुमारे १३ किलोमीटर अंतरावर झाडे लावण्याची मोहीम सुरू आहे. मात्र या झाडांची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, शासनाच्या निधीच्या वापराबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. रस्त्याच्या कडेला लावण्यात आलेली अनेक झाडे पूर्णतः सुकलेली असून त्यामध्ये कुठलाही जीव शिल्लक नसल्याचे दिसून आले. तरीही ही झाडे लागवड झाल्याचे दाखवून शासनाचा व जनतेचा पैसा खर्च केला जात असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्या संगनमतातून हा प्रकार होत असल्याची चर्चा परिसरात सुरू झाली आहे.या १३ किलोमीटर मार्गावर तब्बल ४ हजार झाडांची लागवड केली जात असून त्यासाठी मजुरांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, गेल्या सहा ते सात वर्षांपासून दरवर्षी या मार्गावर झाडे लावण्याची प्रक्रिया राबविली जात आहे. मात्र आजपर्यंत या रस्त्यावर एकही झाड व्यवस्थित वाढलेले किंवा टिकून राहिलेले दिसून येत नसल्याची बाब स्थानिक नागरिकांनी निदर्शनास आणून दिली.नागरिकांच्या मते, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वारंवार निकृष्ट दर्जाची रोपे लावली जात असल्यामुळे ती काही दिवसांतच सुकून जातात. त्यामुळे झाडे लागवडीच्या नावाखाली केवळ कागदोपत्री कामे करून निधीचा अपव्यय केला जात असल्याचा गंभीर आरोप होत आहे.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे वरिष्ठ अधिकारी श्री. अडसूळे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी झाडे तोडण्यास शेतकरी जबाबदार असल्याचा दावा केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. एकीकडे ठेकेदारांकडून निकृष्ट रोपे लावून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप होत असताना, दुसरीकडे अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांवरच आरोप करण्यात येत असल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी पसरली आहे.या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. झाडे लागवडीच्या नावाखाली होत असलेल्या कथित भ्रष्टाचाराकडे सार्वजनिक बांधकाम मंत्री लक्ष देणार का? तसेच जनतेच्या पैशाची होत असलेली उधळपट्टी रोखण्यासाठी शासन कोणती भूमिका घेणार? याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# प्रकल्पग्रस्तांच्या न्याय-हक्कासाठी अमरावतीत सांकेतिक सत्याग्रह


## शेकडो शेतकऱ्यांचा आक्रमक पवित्रा...



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती -**
प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांतील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आज अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय सांकेतिक सत्याग्रह आंदोलन सुरू आहे,बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त शेतकरी सहभागी झाले.प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीतील समांतर आरक्षणाचा कोटा ५ टक्क्यांवरून १५ टक्के करण्यात यावा, तसेच उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांना ५० टक्के राखीव जागांचा लाभ मिळावा आणि पूर्वीप्रमाणे थेट नोकरी देण्याची व्यवस्था लागू करावी, या प्रमुख मागण्या आंदोलकांनी केल्या.याशिवाय, प्रकल्पग्रस्तांना स्पर्धा परीक्षांमध्ये समांतर आरक्षणाचा लाभ मिळावा, प्रकल्पग्रस्तांच्या इतर प्रलंबित मागण्यांची तातडीने पूर्तता करावी आणि शासनाने प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.अनेक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्याप त्यांच्या अधिग्रहित शेतजमिनीचा योग्य मोबदला मिळालेला नसल्याने त्यांच्यामध्ये तीव्र नाराजी आहे. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या या प्रश्नांकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.या सांकेतिक सत्याग्रह आंदोलनात अमरावती जिल्ह्यासह विभागातील इतर जिल्ह्यांमधूनही मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त शेतकरी सहभागी झाले. आपल्या न्याय्य हक्कांसाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली.-

# महायुती धर्माविरुद्ध फडणवीस सरकारचीच नीती?

## शेतकऱ्यांच्या बँकेवरच शासनाचा घाव; मित्रपक्षाला डावलून काँग्रेसला राजकीय बळ?





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**
बच्चू कडू हे सध्या अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष असून त्यांच्या नेतृत्वाखाली बँकेचा शेतकरीकेंद्रित, पारदर्शक आणि सर्वसमावेशक कारभार सुरू आहे. बँकेने तब्बल ८३ टक्के शेतकऱ्यांना कर्जवाटप केले असताना महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाने सहसंचालकांनी फेटाळलेल्या ११६३ अर्जदारांना सभासदत्व देण्याचा घेतलेला निर्णय शेतकऱ्यांच्या बँकेवरच अन्याय करणारा ठरत असल्याची भावना निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे या निर्णयाचा राजकीय फायदा काँग्रेसशी संबंधित गटाला होणार असल्याने महायुतीतील मित्रपक्षाला डावलून काँग्रेसला राजकीय बळ देण्याचा प्रयत्न फडणवीस सरकारकडून होत आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे.

जिल्हा बँकेत शेतकरी आणि वैयक्तिक असे दोन प्रकारचे सभासद होते. वैयक्तिक सभासदत्वासाठी सुमारे सहा हजार अर्ज दाखल झाल्यानंतर बँकेच्या संचालक मंडळाने उपविधीत कायदेशीर दुरुस्ती करून ही तरतूद संपुष्टात आणली आणि अर्ज फेटाळले. त्यानंतर सुमारे १२०० अर्जदारांनी सहकार विभागाच्या सहसंचालकांकडे अपील केले. बहुतांश अपिले फेटाळण्यात आली. मात्र पुढील प्रक्रियेत महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाने ११६३ अर्जदारांना पात्र ठरवून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासदत्व देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे बँकेच्या विद्यमान कारभारावर परिणाम होणार असल्याची चर्चा आहे.

या ११६३ अर्जदारांचा संबंध काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष व बँकेचे माजी अध्यक्ष बबलू देशमुख, माजी मंत्री यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार प्रा. वीरेंद्र जगताप आदींच्या गटाशी असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या बँकेत पारदर्शक कारभार सुरू असताना काँग्रेसशी संबंधित गटाला राजकीय बळ देण्याचा हा प्रयत्न असल्याची चर्चा अमरावतीच्या राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.बच्चू कडूंचे सर्वसमावेशक शेतकरी नेतृत्व-शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, विद्यार्थी आणि मेंढपाळांच्या प्रश्नांसाठी बच्चू कडू यांनी विधान परिषदेत सातत्याने आक्रमक आणि अभ्यासपूर्ण भूमिका घेतली आहे. संबंधित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रश्नांचा सातत्याने पाठपुरावा केला. त्यामुळे त्यांचे नेतृत्व एका पक्षापुरते मर्यादित न राहता शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्यांचे सर्वसमावेशक नेतृत्व म्हणून पुढे आले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठीही त्यांनी सरकारला धारेवर धरले. सातबारा कोरा, कोरा, कोरा या आश्वासनाची आठवण करून देत वाडा आंदोलन, रायगडाच्या पायथ्याशी आंदोलन, गुरुकुंज मोझरी येथील अन्नत्याग आंदोलन, पापड ते चिलगव्हाण सातबारा कोरा यात्रा, राज्यभर शेतकरी मेळावे आणि नागपूर येथील आंदोलनातून त्यांनी सरकारवर दबाव निर्माण केला. त्यामुळे कर्जमाफीचा प्रश्न ऐरणीवर आला. या आंदोलनाचा राजकीय वचपा काढण्यासाठीच बच्चू कडूंच्या प्रभावाच्या क्षेत्रात काँग्रेसला राजकीय बळ देण्याचा प्रयत्न होत आहे का, असा सवाल ११६३ सभासदत्वाच्या निर्णयामुळे अधिक तीव्र झाला आहे. जिल्हा बँकेच्या विद्यमान सत्ताकारणात बच्चू कडू यांच्यासह आमदार राजेश वानखडे, आमदार प्रतापदादा अडसड, आमदार प्रवीण पोटे, सहकार नेते सुधाकर भारसाकळे, माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे, श्री प्रशांत डहाणे,आमदार संजय खोडके, आमदार सुलभाताई खोडके, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुरेखाताई ठाकरे आणि श्री. आनंद काळे यांचा समावेश आहे. अशा परिस्थितीत महायुतीतील मित्रपक्षाच्या नेतृत्वाखालील शेतकऱ्यांच्या बँकेला बळ देण्याऐवजी काँग्रेसशी संबंधित गटाला ११६३ नव्या सभासदांच्या माध्यमातून राजकीय बळ मिळेल, असा निर्णय का घेण्यात आला? हा प्रश्न आता अधिक गंभीर झाला आहे.

### कर्जमुक्ती आंदोलनचा राजकीय वचपा काढण्याची खेळी

बच्चू कडूंनी कर्जमुक्तीसाठी सरकारला जाब विचारला, आंदोलनाच्या माध्यमातून सरकारवर दबाव निर्माण केला आणि शेतकऱ्यांचा प्रश्न केंद्रस्थानी आणला. त्या आंदोलनाचा राजकीय वचपा काढण्यासाठीच त्यांच्या नेतृत्वाखालील शेतकऱ्यांच्या बँकेत काँग्रेसला राजकीय बळ देण्याचा प्रयत्न केला जात आहे का, हा प्रश्न आता अधिक ठळक झाला आहे. शेतकऱ्यांची बँक व्यवस्थित चालत असताना महाराष्ट्र शासनाच्या सहकार विभागाला ११६३ नव्या सभासदत्वाचा निर्णय घेण्याची गरज काय? महायुतीतील मित्रपक्षाला डावलून काँग्रेसला राजकीय बळ देण्यामागचे राजकीय गणित काय? आणि शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी सरकारला घेरणाऱ्या बच्चू कडूंच्या आंदोलनाचा हा वचपा आहे का? राजकीय गणित साधण्याच्या प्रयत्नात शेतकऱ्यांच्या बँकेवर घाव बसत असेल, तर त्याची किंमत बच्चू कडूंना नव्हे, तर अमरावती जिल्ह्यातील असंख्य शेतकऱ्यांना मोजावी लागणार आहे.


सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती येथून प्रकाशित
धन्यवाद वाचकांनो!
25 लाख वाचकांनी
आमच्या साईड ला भेट दिल्याबद्दल
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
मुख्य पृष्ठ
अमरावती
विदर्भ
महाराष्ट्र
देश-विदेश
ब्रेकिंग न्यूज
अमरावतीत विकासकामांचा धडाका
पावसाचा जोर वादला
शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी
राज्यातील राजकीय घडामोडी
क्रीडा क्षेत्रातील ताज्या बातम्या
HTTPS://E PAPER.VIDARBHAPRAJASATTAK.COM
आपल्या परिसरातील बातम्या व राज्यभरातील ताज्या घडामोडी
वाचा आता आमच्या सोबत
विदर्भ प्रजासत्ताक
सांध्य मराठी दैनिक
आमच्या चॅनल ला आजच जॉईन व्हा!
स्थानिक बातम्यांवर विशेष भर
राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व कृषी बातम्या
फोटो व व्हिडिओ सह अपडेट
तत्काळ व विश्वसनीय बातम्या
मो. 8605948853
Follow Us On :